अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ । ▶ वर्ष : २४ वे ▶ अंक : ५७ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## जुना विडी घरकुल परिसरात दोघांची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : जुना विडी घरकुल परिसरातील राघवेंद्रनगर आणि प्रियदर्शनीनगर अशा विविध ठिकाणी दोघा तरुणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या नोंदी पोलिसात रविवारी झाल्या आहेत.

पहिली घटना राघवेंद्र नगरात सोमवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. त्या ठिकाणी २९ वर्षीय तरुण विजय सुनील गुंजोटे (वय २९, रा. राघवेंद्र नगर) याने राहत्या घरासमोरील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. तो राघवेंद्रनगर येथील नवले यांच्या घरात भाड्याने राहण्यास आहे. सोमवारी दुपारी दीडच्या सुमारास घरासमोरील झाडाला दोरीच्या सहाय्याने त्याने गळफास घेतला. याची माहिती मिळाल्यानंतर बीट मार्शलच्या पोलिसांनी त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले.मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे. हवालदार मुजावर पुढील तपास करीत आहेत. दुसरी घटना प्रियदर्शनी नगरात रविवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. मोहन अंबादास कारमपुरी (वय २६, रा.प्रियदर्शनी नगर) असे मयताचे नाव आहे. सकाळी ८ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद देखील एमआयडीसी पोलिसात झाली आहे. या मागचे कारण समजले नाही. हवालदार कटके पुढील तपास करीत आहेत.

## कोर्टी गावातील थरार

# संतापाचा उद्रेक, आरोग्य केंद्राला टाळे

## परिचारिकेमुळे महिलेचा मृत्यू झाल्याचा नातेवाईकांचा आक्रोश

- पोलिसांच्या शिष्टाईमुळे वातावरण निवळले
- अहवाल आल्यानंतर गुन्हा दाखल करण्याची हमी
- मृत महिलेच्या नातेवाईकांचा संताप अनावर; प्रसूतीनंतर झालेल्या अतिरक्तस्त्रावामुळे विवाहितेचा मृत्यू झाल्याची तक्रार



कोर्टी येथील आरोग्य केंद्रात मृत महिलेच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त करून केंद्राला टाळे ठोकले.

**करमाळा/प्रतिनिधी**

**तालुक्यातील कोर्टी येथील आरोग्य केंद्रात प्रसूतीनंतर झालेल्या अतिरक्तस्त्रावामुळे राशीन येथील विवाहितेचा मृत्यू झाला. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत परिचारिकेने या महिलेची प्रसूती केल्याचा आणि त्यामुळे विवाहितेचा मृत्यू झाल्याचा खळबळजनक आरोप करत विवाहितेच्या नातेवाईकांनी केला. संतप्त नातेवाईकांनी कोर्टी प्राथमिक आरोग्य केंद्राला टाळे ठोकून संबंधित डॉक्टर आणि पारिचारीकेला घेराव घातला. ही घटना सोमवारी घडली.**

राशीन (ता.कर्जत, जि. अहील्यानगर) येथील योगेश आढाव यांनी सांगितले आहे की, शुक्रवारी २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजता त्यांच्या पत्नी रुपाली यांना कोर्टी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूतीसाठी दाखल केले होते. रात्री साडेबाराच्या दरम्यान प्रसूती झाल्यानंतर बराच वेळ झाला तरी रूपाली यांचा रक्तस्त्राव थांबत नव्हता.

> "प्रसूती वेळी डॉ. चोरगे या हजर असल्याची माहिती दिली असून उत्तरीय तपासणी अहवाल आल्यानंतर महिलेच्या मृत्यूचे नेमके कारण कळणार आहे.
> **-डॉ. काटकर,** तालुका वैद्यकीय अधिकारी

याबाबत योगेश यांच्या सासूंनी योगेश यांना सांगितले. यानंतर योगेश यांनी कर्तव्यावर असलेल्या पारिचारीकेला याबाबत माहिती दिली. यावेळी डॉ. चोरगे यांनी प्रत्यक्षात येऊन रुग्णाची तपासणी करण्याऐवजी आरोग्य केंद्रानजीक असलेल्या कॉर्टरमधूनच परिचारिका सय्यद यांना मोबाईलवर सूचना दिल्या. त्यानंतर पारिचारिका सय्यद यांनी रुग्णाच्या नातेवाईकांना थोड्या वेळात रक्तस्त्राव बंद होईल असे सांगितले. मात्र बराच वेळ रक्तस्त्राव थांबला नाही. त्यामुळे नातेवाईकांनी रूपाली यांना करमाळा उपजिल्हा रुग्णालयात नेण्याचा निर्णय घेतला. करमाळा उपजिल्हा रुग्णालयात आणल्यानंतर वैद्यकिय अधिकाऱ्यांनी तपासून रूपाली यांना मृत घोषित केले.

रविवारी रूपाली यांच्यावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर सोमवारी रूपाली यांच्या पतीसह माहेरच्या नातेवाईकांनी कोर्टी प्राथमिक आरोग्य केंद्राला टाळे ठोकत वैद्यकिय अधिकारी डॉ. चोरगे आणि पारिचारिका सय्यद यांना घेराव घालत याबाबतचा जाब विचारला. दरम्यान सोमवारी दुपारी करमाळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पी.बी टिळेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित शिंदे यांनी नातेवाईकांची समजूत काढून उत्तरीय तपासणीनंतर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचा चौकशी अहवाल आल्यानंतर गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन दिले आणि आरोग्य केंद्राचे काम सुरळीत केले.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**सोलापूर** : एका १८ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कुमठा नाका परिसरातील तक्षशील नगरात सोमवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. गणेश मोहन कुडके (वय १८, रा. तक्षशील नगर) असे मयताचे नाव आहे. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील दरवाजाच्या लाकडी वाशाला साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. मयत गणेश कुडके याच्या पश्चात आई आणि दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




त्यांना 'राजकारणात करिअर करायचे' असं म्हणत होते!

संगम श्री डे
270-90-488

संगम श्री नाईट
148-32-336

कल्याण
126-91-560

मुंबई
478-92-255

# उज्वला थिटे उमेदवारी प्रकरणात आज कोर्टात विधीज्ञांची रंगणार जुगलबंदी!




- निवडणूक निणर्याधिकारी यांनी मांडलं म्हणणं
- सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्राला औत्सुक्य
- छापा काटा काही पडो, घडणार नवा इतिहास

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

केवळ सोलापूर जिल्हा अन् महाराष्ट्रच नव्हे, तर देशभरात चर्चेत आलेल्या मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाच्या अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उज्वला थिटे-पाटील यांच्या उमेदवारी अर्जावर आज सोलापूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयात अंतिम फैसला होणार आहे. सरकारी पक्ष आणि उमेदवार थिटे यांचे वकील अ‍ॅड. दत्ता घोडके यांची जुगलबंदी कोर्टात रंगणार आहे. यावेळी कायद्याचा खिस पाडला जाणार आहे. थिटे-पाटील यांच्या उमेदवारीच्या निकालाकडं उभ्या देशाचं लक्ष लागून राहिलं आहे.

विशेषत्वे, उमेदवारी अर्जाच्या पाश्र्वभूमीवर, उमेदवार थिटे-पाटील यांच्या बाजूने निकाल लागो किंवा विरोधात जावो अर्थात नाण्याच्या छापा काटा कोणत्याही बाजूने पडो नवा इतिहास हा घडणार हे निश्चित. उज्वला थिटे-पाटील यांच्या बाजूने उमेदवारींसंदर्भात निकाल झाल्यास त्या निवडणुकीच्या आखाड्यात राहतील. ६८ वर्षांची बिनविरोधची इथली पंरपरा खंडित होईल.

(अधिक् वृत्त पान ५ वर)

### मुळीक, भदर सगळेच सोमवारी हजर झाले कोर्टात

उज्वला थिटे-पाटील यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केलेल्या अर्जावर सोमवारी सुनावणी झाली. यादरम्यान मुख्य निवडणूक निणर्याधिकारी सचिन मुळीक, भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्राजक्ता पाटील, प्रशासकीय अधिकारी सुरेश भदर, अपक्ष उमेदवार सरस्वती शिंदे हे कोर्टात हजर झाले. त्यांनी आपली बाजू मांडली.

### आज लागणार निकाल : अ‍ॅड. घोडके

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतीच्या बिनविरोध निवडणुकीवरून निर्माण झालेल्या वादाला न्यायालयीन लढाईत नाट्यमय वळण मिळण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार उज्वला थिटे-पाटील यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सोलापूर जिल्हा आणि सत्र न्यायालयात सुनावणी सोमवारी झाली आहे. मंगळवारी निकाल लागेल अशी शक्यता अ‍ॅड. दत्ता घोडके यांनी व्यक्त केली आहे.

### ३ डिसेंबरला होणार घोषणा...

सध्या सुरू असलेल्या सुनावणीत न्यायालयाने निवडणूक अधिकारी, नव्याने घोषित करण्यात आलेल्या नगराध्यक्ष तथा आक्षेप घेणाऱ्या अपक्ष उमेदवार सरस्वती शिंदे यांना आज शपथपत्रासह आपले प्रतिपादन सादर करण्याचे आदेश दिले आहेत. महत्त्वाचं म्हणजे, ३ डिसेंबरला निकाल लागेपर्यंत नगरपंचायत बिनविरोध घोषित करता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश न्यायालयाकडून देण्यात आला आहे, अशी माहिती उज्वला थिटेंचे वकील अ‍ॅड. दत्ता घोडके यांनी दिली.

## 'शोले'तला अविस्मरणीय 'विरु' काळाच्या पडद्याआड

# ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन



**मुंबई** : हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी सोमवारी निधन झाले. वयाशी संबंधित आजारांमुळे काही दिवसांपासून ते हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते. या उपचारांना ते सकारात्मक प्रतिसाद देत असल्याने त्यांना जुहू येथील राहात्या घरी पुन्हा आणलं गेलं होतं. धर्मेंद्र यांच्या प्रकृतीत होत असलेली सुधारणा पाहून चाहतेही खूश होते; पण अखेर त्यांनी जगाचा निरोप घेतला. धर्मेंद्र यांच्या निधनानं बॉलीवूडचा ही-मॅन हरपला आहे.

धर्मेंद्र यांनी आजवरच्या त्यांच्या कारकिर्दीत अनेक बॉलीवूड सिनेमे केले. त्यांच्या अभिनयाने त्यांनी गेली सहा दशके प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. हा हरहुन्नरी अभिनेता आपल्यातून हरपला. त्यांच्या जाण्याने मनोरंजनसृष्टीत एक पोकळी निर्माण झाली आहे. धर्मेंद्र यांच्या फिल्मी कारकिर्दीबद्दल सांगायचे झाल्यास, 'फिल्मफ`अर' मॅगझिनच्या पहिल्या टॅलेंट हंट स्पर्धेचे ते विजेते ठरले होते. मग त्यांनी अर्जुन हिंगोरानी यांच्या 'दिल भी तेरा हम भी तेरे'मधून अभिनय करिअरची सुरुवात केली. नंतर १९६१ मध्ये आलेल्या 'शोला और शबनम'नंतर त्यांना चांगलीच ओळख मिळाली.


(अधिक् वृत्त पान ५ वर)

# निवृत्तीनंतर न्या.गवईंनी देशापुढे ठेवला नवा आदर्श

**नवी दिल्ली** : केंद्र असो वा राज्य याठिकाणच्या सरकारी खुर्चीवरून खाली उतरल्यानंतर सरकारी बाबूंसह मंत्र्यांना, खासदारांना, आमदारांना पदांचा,गाड्यांचा आणि टोलेजंग बंगल्यांचा मोह सुटत नाही.कधी कधी अशा मोहींना हुसकावून लावण्याची वेळ येत असते पण आपल्या सर्वोच्च न्यायालयाचे मावळते सरन्यायाधीश भूषण गवई यांनी देशापुढे एक नवा आदर्श घालून दिला आहे.नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी सोमवारी शपथग्रहण केल्यानंतर न्या.गवई यांनी सरकारी वाहन व इतर सुविधांचा त्याच दिवशी त्याग केला आणि सामान्य नागरिकाप्रमाणे ते कार्यक्रमातून बाहेर पडले.

भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून न्या.सूर्य कांत यांनी शपथ घेतली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना शपथ दिली. गवई हे रविवारी सेवानिवृत्त झाले. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा शपथविधी सोहळा सोमवारी पार पडला. त्याला गवई हे देखील उपस्थित होते.

गवई यांनी निवृत्त होताच लगेचच सर्व सरकारी सुविधा सोडल्या. न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी शपथ घेताच गवई यांनी त्यांची अधिकृत शासकीय कार लगेच तिथेच सोडली आणि एक नवीन आदर्श प्रस्थापित केला आहे. गवई हे शपथविधी सोहळ्यासाठी राष्ट्रपती भवनात त्यांच्या अधिकृत गाडीने दाखल झाले होते. त्यानंतर पुन्हा परत जाताना ते त्यांच्या वैयक्तिक वाहनाने परतले.



न्यायमूर्ती भूषण गवई

शपथविधी समारंभानंतर गवई यांनी सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्यासाठी राखीव अधिकृत वाहन सोडल्याचं सूत्रांनी सांगितल्याचं वृत्तात म्हटलं आहे. त्यामुळे भूषण गवई यांची ही कृती चर्चेत आली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी गवई यांनी हे देखील स्पष्ट केले होते की, निवृत्तीनंतर ते कुठलेही शासकिय पद स्वीकारणार नाहीत. देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी शपथ घेतली. न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्याकडे पुढील १५ महिने सरन्यायाधीशपदाचा कार्यभार असेल. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कलम ३७० रद्द करणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरिकत्व हक्कांवरील प्रकरणांच्या सुनावणीत त्यांचा सहभाग होता. सूर्य कांत यांचा शपथविधी ऐतिहासिक ठरला आहे. कारण या शपथविधी सोहळ्याला सात देशांचे मुख्य न्यायमूर्ती उपस्थित होते. भूतानचे मुख्य न्यायमूर्ती ल्योनपो नोरबू शेरिंग, केन्याच्या मुख्य न्यायमूर्ती मार्था कूमे, मलेशियाच्या संघीय न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती नलिनी पथमनाथन, मॉरीशसच्या मुख्य न्यायमूर्ती बीबी रेहाना मुंगली-गुलबुल, नेपाळचे मुख्य न्यायमूर्ती प्रकाश मान सिंह राऊत यावेळी उपस्थित होते.

९ जानेवारी २००४ रोजी पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाच्या कायमस्वरूपी न्यायाधीश पदावर त्यांची नियुक्ती झाली. त्यानंतर ५ ऑक्टोबर २०१८ ते मे २०१९ पर्यंत न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून काम पाहिले. २४ मे २०१९ रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयात बढती मिळाली. १२ नोव्हेंबर २०२४ पासून सर्वोच्च न्यायालयाच्या कायदेशीर सेवा समितीचे अध्यक्ष म्हणूनही काम करत आहेत आणि आता ते भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशी झाले आहेत.

### न्यायमूर्ती सूर्य कांत कोण आहेत?



सरन्यायाधीश सूर्य कांत यांचा जन्म १० फेब्रुवारी १९६२ रोजी हरियाणातील हिसार येथील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. १९८१ साली त्यांनी हिसार येथील शासकीय महाविद्यालयातून पदव्युत्तर पदवी संपादन केली. १९८४ मध्ये त्यांनी रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठातून कायद्याची पदवी प्राप्त केली आणि हिसार येथील जिल्हा न्यायालयात वकिली सुरू केली. त्यानंतर १९८५ मध्ये ते पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी चंदीगडला गेले. तिथे त्यांनी संवैधानिक, सेवा आणि दिवाणी बाबींमध्ये कौशल्य मिळवले.